| MHKO160007872021 | **<u>नियमित दिवाणी दावा क्र.१०७/२०२१ मधील नि.क्र.३५ खालील आदेश</u>** |
|---|---|

**०१.** वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरूस्तीसाठी दाखल केला आहे.

**०२.** वादीचे थोडक्यात कथन की, वादींनी प्रस्तुतचा दावा हा मनाईसाठी दाखल केला आहे. वादीने दावा अर्जी कलम ३ मध्ये नजरचुकीने व अनावधानाने तिस-या ओळीमध्ये प्रतिवादी क्र. ४ ते ६ ऐवजी प्रतिवादी क्र. २ ते ५ असे नमूद करावे, तसेच त्याच पॅरामधील सब पॅरामध्ये दुस-या ओळीमध्ये प्रतिवादी क्र. २ ते ६ ऐवजी प्रतिवादी क्र. २ ते ५ असे नमूद करावे अशी विनंती केली आहे.

**०३.** प्रतिवादीं यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे देऊन योग्य ते आदेश पारीत करणेबाबत विनंती केली आहे.

**०४.** मी वादी, प्रतिवादीं यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अभिलेखावरील सर्व कागदपत्रें, वादी आणि प्रतिवादीं यांचे वादपत्र यांचे अवलोकन केले आहे. वादीने सदर अर्जाद्वारे दावा अर्जी कलम ३ मध्ये तिस-या ओळीमध्ये प्रतिवादी क्र. ४ ते ६ ऐवजी तसेच त्याच पॅरामधील सब पॅरामध्ये दुस-या ओळीमध्ये प्रतिवादी क्र. २ ते ६ ऐवजी दोन्ही ठिकाणी प्रतिवादी क्र. २ ते ५ असे नमूद करावे अशी विनंती केली आहे. प्रतिवादींनी सदरबाबत योग्य ते आदेश पारीत करणेबाबत विनंती केली आहे. वादीची सदर दुरूस्ती ही फॉरमल स्वरूपाची असून त्यामुळे दाव्याचे स्वरूपावर कोणताही परिणाम होणार नाही. प्रतिवादींनी सदर दुरूस्तीबाबत कोणताही आक्षेप घेतलेला नाही.

सबब, सदर दुरूस्ती मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, वर नमूद निष्कर्षास अनुसरून मी खालील आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

**०१.** अर्ज नि.३५ मंजूर करण्यात येत आहे.

**०२.** वादी यांना वादपत्रामध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे आणि वादी यांनी अर्जामध्ये नमूद दुरूस्ती पुढील तारखेपर्यंत करावी आणि दुरूस्त दावा प्रत न्यायातयात दाखल करावी.

खुल्या न्यायालयात घोषित.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Pankaj Bhimrao Pawar

**दिनांक- ११/०८/२०२५**

**( पी. बी. पवार )**
**दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**मलकापूर-शाहूवाडी**